# १८ मोटार वाहन विभागाकडून पुरविण्यात येणा-या विविध सेवा

१) स्तंभ क्रमांक (४) मध्ये नमूद, कालमर्यादा १ नोव्हेंबर, २०११ रोजी अस्तित्वात असणा-या सरासरी कामकाजाच्या हाताळणीसाठी आणि कर्मचारी व अधिका-यांच्या मंजुर पदांच्या १०० टक्के पदे भरलेली असल्याचे गृहितावर अवलंबून आहेत.

२) शिबीर कार्यालयांत आणि मुख्यालयात स्विकारल्या जाणा-या अर्जासाठी स्वतंत्र कालमर्यादा नमूद केल्या आहेत.

३) अनुज्ञप्ती व नोंदणीप्रमाणपत्रे पोष्टामार्फत घरपोच पाठविण्याचे योजनेसंदर्भात ही कालमर्यादा प्रमाणपत्रे विभागाकडून पोस्टाचे प्रतिनिधींकडे बटवडयासाठी नमूद केली आहे.(पोष्टामार्फत प्रत्यक्ष वितरणास लागणारा कालावधी यात समाविष्ट नाही)

४) नमुद कालमर्यादांमध्ये फक्त कामकाजाचे दिवसांचा समावेश आहे.

५) स्मार्टकार्ड स्वरुपातील नोंदणी प्रमाणपत्रे डिस्क्लेमर वर अर्जदाराची स्वाक्षरी झाल्यानंतर त्यांनी स्मार्टकार्डसाठी रु. ३५०/- चा भरणा केल्यावर जातात. सबब कालमर्यादेची गणना त्यानंतरच करण्यात येईल.

**(अ) अनुज्ञप्ती विषयक माहिती तक्ता.**

| अनु. क्रमांक | विभागाकडून/ कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | सेवा पुरविण्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर सेवा पुरविली जाण्याची कालमर्यादा | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिकाऊ लायसेन्स | (१) नमुना क्रमांक २ मधील अर्ज- कें. मो. वा. नि. १०,<br>(२) वैद्यकीय प्रमाणपत्र (नमुना-१ व १अ) के.मो.वा.नि.५(२) के.मो.वा.नि.५(१), (३),७,१० (अे), १८(डी)<br>(३) पासपोर्ट आकाराचे तीन फोटो<br>(४) वयाचा दाखला (शाळेचा दाखला, एस.एस.सी. प्रमाणपत्र, शाळा/कॉलेजचा वयाचा दाखला, अन्य तारखेचे प्रमाणपत्र या पैकी एक)<br>(५) निवासी पत्याचा पुरावा (लाईट बिल, टेलिफोन बिल, मतदार यादी प्रमाणपत्र, आधार प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, पासपोर्ट इत्यादीपैकी एक) परीक्षेकरिता नियमाची माहिती कार्यालयातील माहितीपत्रकात दिली आहे.<br>(६) शुल्क रुपये ३०/- | कार्यालयात अर्ज केल्यावर तीन दिवस<br><br>शिबीर कार्यालयात अर्ज केल्यास सात दिवस | मो. वा. नि. / सहा. मो.वा.नि. | सहा /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सोबत जोडलेल्या टेलिफोन यादीतील क्रमांकानुसार |